**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय**

**जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती**

**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा**

**दिनांक १३/११/२००९**

**दुपारी ३.३० वाजता**

**स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

**जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती**

**मा. जिल्हाधिकारी, अमरावती महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३/११/२००९ रोजी दुपारी ३.३० वाजता संपन्न होणा-या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची टिपणी.**

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.** | | **दिनांक १०/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे.** | | |
| **२.** | **दिनांक १०/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :-** | | | | |
| | **१. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्या बाबत तसेच गोपाल नगर ते बडनेरा हा मार्ग जड वाहतुकीसाठी बंद करण्या बाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **मागील सभेत महानगरपालिका, अमरावतीचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की रेल्वे ट्रॅकला समांतर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव भूसंपादन विभागास सादर करण्यांत आलेला आहे.**<br>**सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्याचे दृष्टीने केलेल्या कार्यवाहीची माहिती महानगरपालिका, अमरावतीचे प्रतिनिधी सभेला देतील.** | **महानगर पालिका, अमरावती.** | |
| | **२. ऑईल मिलचे क्लस्टर अमरावती येथे निर्माण करणेबाबत.** | **जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती.** | **मागील सभेत विदर्भ वैधानिक मंडळाला सविस्तर प्रस्ताव सादर करण्याची सूचना एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनला केली होती. तसेच नवीन उद्योग जसे मार्बल/ग्रेनाईट, प्लॅस्टीक इत्यादींचे क्लस्टर तयार करता येईल काय? याबाबत अभ्यास करण्याचा निर्णय घेण्यांत आला होता, औद्योगिक संघटनेने इंजिनियरींग वर्कशॉप, रेडीमेड गारमेंट या उद्योगांचा सुध्दा क्लस्टरकरीता विचार व्हावा, अशी सूचना केली होती.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशन, अमरावती.** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | **३. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून रु. १०.५० प्र.घ.मि. या दराने औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याकरीता लागणारी जलवाहिनी इत्यादीची सुविधा पुरविण्या बाबतचा प्रस्ताव मऔविम, मुंबईला पाठविण्यांत आला असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घरगुती वापराच्या दराऐवजी वाणिज्यिक दर आकारण्यांत येईल, असे कळविले आहे.**<br>**मागील सभेत औद्योगिक परिसरात पिण्याचे पाणी फक्त दोन तासाकरीता सोडण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सकारात्मक विचार करावा, असे सूचविण्यांत आले होते.** | **मऔविम, अमरावती.**<br><br>**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती.** | |
| | **४. एमआयडीसी अमरावती येथे उद्योगासाठी सब-स्टेशन मंजूर करणेबाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, मराविविकंम (ओ अँड एम), अमरावती यांना पत्र दि. १६/१२/०८ अन्वये मराविविकंमच्या मुलभूतसोयी योजना अंतर्गत सदर सब-स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली आहे.**<br>**मागील सभेत मराविविकंमच्या प्रतिनिधी यांनी माहिती दिली की सब-स्टेशनच्या मंजूरीचा प्रस्ताव त्यांचे वरीष्ठ कार्यालयास मंजूरीसाठी पाठविण्यांत आला आहे.** | **मऔविम, अमरावती.** | . |
| | **५. नांदगांवपेठ एमआयडीसी मधील भूखंड उपलब्ध करण्याबाबत तसेच स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे याबाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **नांदगांवपेठ पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीत भूखंड मिळण्याकरीता २५०-३०० प्राप्त अर्जामध्ये दिल्लीच्या उद्योजकांचे अर्ज जास्त असल्यामुळे सदर अर्ज मऔविमद्वारा प्रलंबीत ठेवण्यांत आलेले आहेत. करीता स्थानिक उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे, असे मागील सभेत ठरले होते.**<br>**मागील सभेत ठरल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना पूर्वीप्रमाणेच भूखंड वाटपाचे अधिकार प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांचे स्तरावर देण्यांत यावे याबाबत कार्यालयीन पत्र दि. २/९/२००९ अन्वये कळविण्यांत आले आहे.** | **मऔविम, अमरावती.** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | **६. व्हॅट अंतर्गत अदा करण्यांत आलेल्या टॅक्सची रक्कम परत न मिळत असल्याबाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **मागील सभेला विक्रीकर विभाग, अमरावतीचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की ज्या उद्योग घटकांचे लेखा परिक्षण झालेले आहे त्यांना टॅक्सची रक्कम परत करण्यांत येत आहे.**<br>**करीता संघटनेच्या सदस्यांची यादी बनवावी व सर्व सदस्यांकडून कागदपत्रांची आवश्यक ती पूर्तता होईल असे पाहावे, अशी सुचना औद्योगिक संघटनेला केली होती.** | **विक्री कर विभाग, अमरावती.**<br><br>**एमआयडीसी इंडस्ट्रीयल असो. अमरावती.** | |
| | **७. वजन व मापे कार्यालयाचे अधिकारी यांना जिल्हा उद्योग मित्र समिती सभेला उपस्थित राहणे कळविण्याबाबत तसेच वजन व मापे कार्यालयाने निश्चित केलेल्या एका अटीचीही पूर्तता नसली तरी पेनॉल्टी लावत असल्याबाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसियेशन, अमरावती.** | **सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशस्त्र (वजन व मापे), अमरावती यांनी माहिती दिली होती की आकारण्यांत येत असलेला दंड हा नियमानुसार असतो. सदर दंड हा केंद्र शासनाच्या कायद्यानुसार असून त्याप्रमाणे अंमलबजावणी त्यांच्या कार्यालयाद्वारे करण्यांत येते.**<br>**करीता मागील सभेत ठरल्याप्रमाणे कार्यालयीन पत्र दिनांक २/९/२००९ अन्वये सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशस्त्र (वजन व मापे), अमरावती यांना औद्योगिक घटकांनी करावयाच्या पूर्ततेबाबत एक चेक लिस्ट औद्योगिक संघटनेला पुरवावी, असे कळविण्यांत आले आहे.** | **वैध मापन शास्त्र (वजन व माप), अमरावती.** | |
| | **८. इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस मिळणेबाबत.** | **अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती.** | **पुरवठा विभागास एकूण १३ उद्योग घटकांना केरोसीन वाटपाकरीता प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राद्वारे दि. १६/१/२००६ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. दि. ४/११/२००८ रोजी झालेल्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे मागील सर्व संदर्भासह पुन्हा दि. १२/११/२००८ रोजी प्रस्ताव यादीसह सादर करण्यांत आलेला आहे.**<br>**केरोसीनच्या पुरवठयाबाबत माहे मार्च २००९ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यांत येत आहे. तसेच मुंबई येथील डिलरशी पुरवठयाबाबत संपर्क साधण्यांत येत आहे. तालुकास्तरावर एक व जिल्हास्तरावर एक डिलरशीप देण्यांत येणार आहे, अशी चर्चा झाली होती.**<br>**जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती सभेला सद्य:स्थिती अवगत करतील.** | **पुरवठा विभाग, अमरावती.** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | **९. जिनींग व प्रेसींग उद्योग घटकांना एल.टी. कनेक्शन २०० एच.पी. पर्यंत देण्यांत यावे, तसेच १४ ते १६ तास लोड शेडींग होत असल्यामुळे रात्रौला सतत १० तास नियमित विद्युत मिळणेबाबत.** | **वरुड तालुका जिनींग अँड प्रेसींग कापूस व्यापारी संघ, वरुड.** | **वरुड तालुका जिनींग अँड प्रेसींग कापुस व्यापारी संघ, वरुड या संघटनेने एल. टी. लाईनवर २०० एच. पी. कनेक्शन व रात्रीच्या वेळी सतत १० तास नियमित विद्युत मिळावी, अशी मागणी केली आहे.<br>ग्रामीण भागांत एल.टी. लाईनवर १०० एच.पी. तसेच एच.टी. लाईनवर २०० एच.पी. जोडणी देण्यांत येते. सदर बाब ही एमसीईडीसीच्या धोरणांतर्गत बाब आहे. मात्र भार नियमनाबाबत पुढील सुचना काय मिळतात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येणार आहे.<br>मा. जिल्हाधिकारी महोदयांचे दि. ५/१२/२००८ चे व जिल्हा उद्योग केंद्राचे दि.२२/१/०९ पत्रान्वये मुख्य अभियंता, मराविविकंम, मुंबई यांना एल.टी. लाईनवर २०० एच.पी.ची विद्युत जोडणी देण्याबाबत औद्योगिक संघटनेच्या मागणीबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची विनंती करण्यांत आली आहे .** | **मराविविकंम, अमरावती** | |
| | **१०. एमआयडीसी अमरावती येथील नादुरुस्त रस्त्याबाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **मऔविमचे प्रतिनिधी यांनी मागील सभेत माहिती दिली होती की सदर कामासाठी निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत. सदर निविदेकरीता प्राप्त अर्हता प्रपत्रे मंजूरीकरीता त्यांचे वरीष्ठ कार्यालयात सादर केलेली आहेत. सदर प्रस्ताव पाठवून बराच कालावधी लोटलेला आहे. करीता मंजूरी मिळण्याचे दृष्टीने पुन्हा पाठपुरावा करावा, अशी सूचना मागील सभेत मऔविमचे प्रतिनिधी यांना करण्यांत आली असहे.** | **मऔविम, अमरावती** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | **११. मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागेचे वाटप करण्याबाबत.** | **जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती** | **मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला सद्य:स्थितीतील उद्योगाला सुरळीत चालु ठेवण्याकरीता व भविष्यामधील विस्तारीकरणाकरीता अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागा वाटप करण्यांत यावी, याबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक २४/३/२००६ चे पत्रान्वये विनंती केलेली होती.<br>मऔविमचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की सदर उद्योग घटकास पत्राद्वारे त्रृटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यांत आले आहे. तथापि त्रृटीची पूर्तता करण्यांत आलेली नाही.** | **मऔविम, अमरावती** | |
| | **१२. अमरावती एमआयडीसी क्षेत्राला न्यू इंडस्ट्रीयल टाऊनशीप म्युनिसिपल काऊंसीलचा दर्जा मिळण्या बाबत.** | **अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती** | **अमरावती एमआयडीसी ही मनपा हद्दीमध्ये असलेली एकमेव एमआयडीसी असल्यामुळे येथे मनपाचा मालमत्ता कर, ऑक्ट्राय, एमआयडीसी चे सर्व्हीस चार्जेस व वॉटर चार्जेस लागू आहेत. अमरावती महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर उद्योजकांना कच्चा मालावरील जकात कर अर्धा टक्के, कारखान्याच्या बांधकामावर १० पैसे व १५ पैसे प्रति चौ. फुट या सवलतीच्या दराने मालमत्ता कराची आकारणी केली जात होती. आता रु. १.५० प्रति चौ. फुट दर आकारला जात आहे. त्यामुळे येथील उद्योजक शेजारील जिल्हयामधील उत्पादनांच्या किंमती सोबत देखील स्पर्धा करु शकत नाही. चर्चेनंतर सदर विषयाबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यांत यावा, असे ठरले होते.** | **उद्योग मित्र, मुंबई** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | | | **कार्यालयीन पत्र दिनांक २२/७/२००९ अन्वये निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई यांना शासन स्तरावर पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने सदर विषय राज्य स्तरीय समितीमध्ये चर्चेसाठी घेण्यांत यावा, अशी विनंती करण्यांत आली आहे.** | | |
| | **१३. सुपर एक्सप्रेस बायपास एमआयडीसी टी पॉईंटवर आरटीओचे अधिका-याद्वारे वाहन तपासणी करण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरा येथे करण्या बाबत.** | **अमरावती एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजक.** | **कार्यालयीन दिनांक २७/७/२००९ व २/९/२००९ चे पत्रान्वये प्रादेशिक मार्ग परिवहन अधिकारी, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आलेली आहे.**<br>**प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती हे सभेला पुढील माहिती देतील.** | **प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती** | |
| | **१४. नवीन उद्योग उद्योगांना सुरुवातीची ५ वर्षे जकात कर व मालमत्ता कर यांत सुट मिळण्याबाबतचा मनपाने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी बाबत.** | **अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती** | **सदर सभेचा संदर्भ देऊन कार्यालयीन पत्र दि. २/९/२००९ अन्वये जकात कर व मालमत्ता कराची वसुली न करण्याबाबत औद्योगिक संघटनेच्या मागणी बाबत महानगरपालिकेला कळविण्यांत आले आहे.**<br>**त्याचे उत्तरादाखल जकात कर अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती यांनी दि. ८/९/२००९चे पत्रान्वये महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेने ठराव पास करुन निर्णय घेतलेला आहे.** | **महानगर पालिका, अमरावती.** | |
| | **१५. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा बंदोबस्त करण्याबाबत.** | **अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती** | **सभेचा संदर्भ देऊन कार्यालयीन पत्र दि. २/९/२००९ अन्वये एमआयडीसी परिसरात डुकराचा बंदोबस्त तसेच साफसफाई करण्यांबाबत व फॉग मशिनद्वारे फवारणी करण्यांत यावी या औद्योगिक संघटनेच्या मागणी संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याबाबत उप-आयुक्त (प्रशासन), महानगर पालिका, अमरावती यांना कळविण्यांत आले आहे.** | **महानगर पालिका, अमरावती.** | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| **३** | **मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.** | | | | |
| | **१. मे. राधिका पॅकेजींग प्रा. लि., सी-२२, एमआयडीसी अेरिया, नांदगांव पेठ या उद्योग घटकामध्ये काम करणा-या तंत्रज्ञ / कामगार याच्यावर वारंवार हमला करुन मारझोड केल्याबाबत.** | **एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती.** | **सदर उद्योग घटकाने दि. १८/९/२००९ चे पत्रान्वये पोलिस आयुक्त, अमरावती यांचेकडे तक्रार केलेली आहे की त्यांच्या कारखान्यांत काम करणा-या तंत्रज्ञ व कामगार यांच्यावर कांही असामाजिक तत्व हमला करुन मारझोड करीत आहेत. सदर तंत्रज्ञ व कामगार हे एमआयडीसी क्षेत्रातच राहात असल्यामुळे सदर परिसर हा एकाकी परिसर आहे. मारझोड केल्यानंतर रितसर नांदगांव पेठ पोलिस स्टेशनमध्ये तक्रारीची नोंद करण्यांत आलेली आहे. तथापि याबाबत पोलिस विभागाकडून संबंधितावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे संबंधित उद्योग घटकाचे संचालक यांनी भिती दर्शविली आहे की असेच पोलिस विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नसल्यामुळे त्यांचेकडे काम करीत असलेले तंत्रज्ञ / कामगार काम सोडून पळून जातील. त्यामुळे त्यांना त्यांचा उद्योग बंद करावा लागेल.<br>कार्यालयीन पत्र दि. २२/९/२००९ अन्वये जिल्हा पोलिस अधिक्षक (ग्रामीण), अमरावती यांना त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती कळविण्याची विनंती करण्यांत आलेली आहे. तसेच त्यांना सभेला उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत आालेली आहे.** | **पोलिस विभाग, अमरावती.** | |

**महाव्यवस्थापक,**
**जि.उ.कें. तथा**
**सदस्य-सचिव, जि.उ.मि.,**
**अमरावती.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय**

**जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती**

**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा**

**दिनांक १३/११/२००९**

**दुपारी ३.३० वाजता**

**स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

## जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

मा. श्रीमती रिचा बागला (आय.ए.एस.), जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दिनांक १३/११/२००९ रोजी दुपारी ३.३० वाजता संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | श्री. जी. ओ. भारती, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. श्रीमती रिचा बागला (आय.ए.एस.), जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली.<br>महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी माहिती दिली की दिनांक १०/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. कोणिही हरकत उपतस्थित न केल्यामुळे सर्व संमतीने इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.<br>सभेला उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे. | |
| २. | दिनांक १०/८/२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | |
| | १. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्याबाबत तसेच गोपाल नगर ते बडनेरा हा मार्ग जड वाहतुकीसाठी बंद करण्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | गोपाल नगरकडील ट्रक वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सिपना कॉलेज ते एमआयडीसी हा रस्ता करण्यांत यावा, अशी मागणी औद्योगिक संघटनने केली. या मागणीच्या संदर्भात रेल्वे ट्रॅकला समांतर एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याची कार्यवाही महानगरपालिका, अमरावतीमार्फत सुरु आहे.<br>महानगरपालिका, अमरावतीचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की रेल्वे ट्रॅकला समांतर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव भूसंपादन विभागास सादर करण्यांत आला आहे.<br>मा. अध्यक्ष महोदयां यांनी सदर प्रस्ताव पाठविल्याची तारीख कळवावी म्हणजे भूसंपादन विभागाद्वारे कार्यवाही करता येईल, अशी सूचना महानगरपालिका,अमरावतीचे प्रतिनिधी यांना केली. | महानगरपालीका, अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | २. ऑईल मिलचे क्लस्टर अमरावती येथे निर्माण करणेबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती. | उद्योग संचालनालय, मुंबईचे पत्र दिनांक ५ फेब्रुवारी २००७ अनुसार अमरावती येथे उद्योगाचे क्लस्टर निर्माण करण्याकरीता एसआयसीडीपी योजनेअंतर्गत तेल गिरण्याचे क्लस्टरची निवड करण्यांत आली आहे. तथापि ऑईल मिलचे क्लस्टर शक्य नसल्यास नवीन उद्योग जसे मार्बल/ ग्रेनाईट, प्लॅस्टीक इत्यादींचे क्लस्टर, इंजिनियरिंग वर्कशॉप, रेडीमेड गारमेंट या उद्योगांच्या क्लस्टरकरीता औद्योगिक संघटनेने पुढाकार घ्यावयास पाहिजे. तसेच एका क्लस्टरकरीता कमीतकमी २० उद्योजकांनी एकत्र यावयास पाहिजे, अशी चर्चा झाली..<br>क्लस्टर होल्डरच्या ७० टक्के वाट्याकरीता सविस्तर प्रस्ताव औद्योगिक संघटनानी तयार करुन विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांना सादर करावा. त्याकरीता मा. जिल्हाधिकारी स्तरावरुन मंजूरीचे प्रयत्न करण्यांत येईल, असे मा. अध्यक्ष महोदया यांनी सुचविले. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशन, अमरावती. |
| | ३. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसीद्वारा उद्योगांना पुरविण्यांत येणारे पाणी हे पिण्यासाठीसुध्दा वापरण्यांत येते त्यात जडपणा असल्यामुळे प्रकृतीसाठी हानिकारक असल्यामुळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून पाणी पुरविण्याबाबत चर्चा सभेत सुरु आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु. १०.५० प्र.घ.मि. या दराने औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याकरीता लागणारी जलवाहिनी इत्यादीची सुविधा पुरविण्या बाबतचा प्रस्ताव मऔविम, मुख्यालय, मुंबईला मंजूरीकरीता पाठविण्यांत आलेला असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घरगुती वापराच्या दराऐवजी वाणिज्यिक वापराचा दर आकारण्यांत येईल, असे कळविले आहे.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी खुलासा केला की औद्योगिक उत्पादनासाठी मऔविमद्वारा पाणी पुरविण्यांत येत आहे. करीता पिण्याचे पाणी एक दोन तासाकरीता सोडल्यास भागेल, असे प्रतिपादन केले, तसेच प्राधिकरणाद्वारा पुरविण्यांत येणार पाणी औद्योगिक उत्पादनासाठी वापरात येणार नाही, असे स्पष्ट केले.<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावतीचे कार्यकारी अभियंता यांनी सभेला स्वतः उपस्थित न राहता प्रतिनिधी यांना सभेला उपस्थित राहण्यास पाठविल्यामुळे मा. अध्यक्ष महोदया यांनी नाराजी व्यक्त केली व याबाबत खुलासा मागविण्याची सुचना केली. तसेच त्यांना सदर विषयाबाबतचा अहवाल त्यांना सादर करण्याबाबत कळविण्याची सूचना केली. | मऔविम, अमरावती.<br><br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ४. एमआयडीसी अमरावती येथे उद्योगासाठी सब-स्टेशन मंजूर करणेबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी अमरावती येथे भविष्यात येणा-या उद्योग घटकांची विद्युत पुरवठयाची गरज लक्षांत घेता सद्यःस्थितीत असलेला विद्युत भार वाढविण्यांत यावा अशी औद्योगिक संघटनेची मागणी होती. तसेच प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, मराविविकंम (ओ अँड एम), अमरावती यांना पत्र दि. १६/१२/०८ अन्वये मराविविकंमच्या मुलभूतसोयी योजना अंतर्गत सदर सब-स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली आहे.<br>नविन उद्योजकांना देण्याकरीता आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्ध आहे. तसेच सब-स्टेशन उभारणीकरीता आवश्यक कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती देण्यांत आली. | मऔविम, अमरावती.<br><br>मराविविकंम, अमरावती. |
| | ५. नांदगांवपेठ एमआयडीसी मधील भूखंड उपलब्ध करण्याबाबत तसेच स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | नांदगांवपेठ पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीत भूखंड मिळण्याकरीता २५०-३०० प्राप्त अर्जामध्ये दिल्लीच्या उद्योजकांचे अर्ज जास्त असल्यामुळे सदर अर्ज मऔविमद्वारा प्रलंबीत ठेवण्यांत आलेले आहेत. तथापि स्थानिक उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे, असे मागील सभेत ठरले होते.<br>मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे दिनांक ५/१२/२००८ चे अर्ध शासकिय पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे यादृष्टीने कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे.<br>मऔविमच्या प्रतिनिधी यांनी माहिती दिली की याबाबत मऔविम, मुंबई कार्यालयाकडून मंजूरी लवकरच पाठविण्यांत येत आहे व एक महिन्यात भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यांत येईल, असे कळविले.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी सद्यःस्थिती बाबत माहिती पुढील सभेमध्ये सादर करा, अशी सूचना मऔविमच्या प्रतिनिधी यांना केली. | मऔविम, अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ६. व्हॅट अंतर्गत अदा करण्यांत आलेल्या टॅक्सची रक्कम परत न मिळत असल्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | व्हॅट अंतर्गत अदा करण्यांत आलेल्या टॅक्सची रक्कम परत मिळत नाही, ती परत मिळावी, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली होती.<br>मागील सभेला विक्रीकर विभाग, अमरावतीचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की ज्या उद्योग घटकांचे लेखा परिक्षण झालेले आहे त्यांना टॅक्सची रक्कम परत करण्यांत येत आहे.<br>मा. अध्यक्ष महोदयां यांनी सदर विषय हा विक्री कर विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांचे स्तरावर सदर विषयावर चर्चा करावी अशी सूचना औद्योगिक संघटनेला केली. करीता सदर विषय या समितीच्या विषय सूचीवरुन कमी करण्याची सूचना केली (विषय बंद). | विक्रीकर विभाग |
| | ७. वजन व मापे कार्यालय आकारत असलेल्या दंडा बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसियेशन, अमरावती. | वजन व मापे कार्यालयांनी निश्चित केलेल्या अटी हया जाचक असल्यामुळे एक अटही पूर्ण करावयाची राहिली तरी पेनॉल्टी लावण्यांत येते, असे निवेदन औद्योगिक संघटनेने सादर केले आहे.<br>सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशस्त्र (वजन व मापे), अमरावती यांनी मागील सभेत माहिती दिली होती की आकारण्यांत येत असलेला दंड हा नियमानुसार असतो. सदर दंड हा केंद्र शासनाच्या कायद्यानुसार असून त्याप्रमाणे अंमलबजावणी त्यांच्या कार्यालयाद्वारे करण्यांत येते.<br>करीता मागील सभेत वैध मापनशास्त्र (वजन व मापे) चे प्रतिनिधी यांना सुचना करण्यांत आली होती की औद्योगिक घटकांनी करावयाच्या पूर्ततेबाबत एक चेक लिस्ट औद्योगिक संघटनेला पुरवावी, जेणेकरुन त्याप्रमाणे पूर्तता करणे त्यांना सोयीचे जाईल व पुढे अडचण येणार नाही.<br>वजन व मापे कार्यालयाचे अधिकारी सभेत हजर नसल्याने चर्चा होऊ शकली नाही. मा. अध्यक्ष महोदया यांनी संबंधिताना सभेस हजर नसल्याबाबत पत्र देण्याचे निर्देश दिले. | वैध मापन शास्त्र (वजन व मापे), अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ८. इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस मिळणेबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती. | इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस निर्गमित करणे शासनाने बंद केले आहे, ते देणे पूर्ववत सुरु करण्यांत यावे, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली होती.<br>पुरवठा विभागास एकूण १३ उद्योग घटकांना केरोसीन वाटपाकरीता प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राद्वारे दि. १६/१/२००६ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. दि. ४/११/२००८ रोजी झालेल्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे मागील सर्व संदर्भासह पुन्हा दि. १२/११/२००८ रोजी प्रस्ताव यादीसह त्यांना सादर करण्यांत आलेला आहे. याबाबत सतत पाठपुरावा सुरु आहे.<br>मागील सभेत जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांनी माहिती दिली होती की उद्योगांना रॉकेलचा पुरवठयाबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. तसेच सफेद रॉकेल कोणा मार्फत पुरवावे, हे अद्याप निश्चित झाले नाही. याकरीता नागपूर येथील डिलरद्वारा रॉकेल पुरविता येईल किंवा कसे याबाबत पडताळणी करण्यांत येईल, असे सांगीतले.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी याबाबत पुरवठा अधिका-या सोबत १५ दिवसांचे अवधीत स्वतंत्र सभा घ्यावी, अशी सूचना केली. | पुरवठा विभाग, अमरावती. |
| | ९. जिनींग व प्रेसींग उद्योग घटकांना एल.टी. कनेक्शन २०० एच.पी. पर्यंत देण्यांत यावे, तसेच १४ ते १६ तास लोड शेडींग होत असल्यामुळे रात्रौला सतत १० तास नियमित विद्युत मिळणेबाबत. | वरुड तालुका जिनींग अँड प्रेसींग कापूस व्यापारी संघ, वरुड. | वरुड तालुका जिनींग अँड प्रेसींग कापुस व्यापारी संघ, वरुड या संघटनेने एल. टी. लाईनवर २०० एच. पी. कनेक्शन व रात्रीच्या वेळी सतत १० तास नियमित विद्युत मिळावी, अशी मागणी केली आहे.<br>ग्रामीण भागांत एल.टी. लाईनवर १०० एच.पी. तसेच एच.टी. लाईनवर २०० एच.पी. जोडणी देण्यांत येते. सदर बाब ही एमसीईडीसीच्या धोरणांतर्गत बाब आहे. मात्र भार नियमनाबाबत पुढील सुचना काय मिळतात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येणार आहे.<br>मा. जिल्हाधिकारी महोदयांचे दि. ५/१२/२००८ चे व जिल्हा उद्योग केंद्राचे पत्र दि.२२/१/०९ अन्वये मुख्य अभियंता मराविविकंम, मुंबई यांना एल.टी. लाईनवर २०० एच.पी.ची विद्युत जोडणी देण्याबाबत विनंती करण्यांत आली आहे.<br>सभेला उपस्थित मराविविकंमचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की लोड शेडींग बंद करण्यांत आली आहे तसेच एल.टी. कनेक्शन २०० एच.पी. पर्यंत देण्यांबाबत प्रस्ताव त्यांच्या मुख्यालयास सादर करण्यांत आलेला आहे. करीता मा.अध्यक्ष महोदया यांनी सदर विषय बंद करण्याची सुचना केली (विषय बंद).. | मराविविकंम, अमरावती |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | १०. एमआयडीसी अमरावती येथील नादुरुस्त रस्त्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी अमरावती येथील रस्त्यांची सद्य:स्थिती अतिशय वाईट आहे, यामुळे सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्यांत यांवी, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली होती.<br>मऔविमचे प्रतिनिधी यांनी सभेत माहिती दिली की टेंडर मंजूर करुन एक आठवड्यात काम सुरु करण्यांत येत आहे. करीता मा.अध्यक्ष महोदया यांनी विषय बंद करण्याची सुचना केली (विषय बंद).. | मऔविम, अमरावती |
| | ११. मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागेचे वाटप करण्याबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती | मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाने दिनांक २९/१२/२००८ चे पत्रान्वये असे कळविले आहे की सदर उद्योग घटकाला सद्य:स्थितीतील उद्योगाला सुरळीत चालु ठेवण्याकरीता व भविष्यामधील विस्तारीकरणाकरीता अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागा वाटप करण्यांत यावी, याबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक २४/३/२००६ चे पत्रान्वये विनंती केलेली होती. कार्यालयीन पत्राद्वारे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक ७/१/२००९ चे पत्रान्वये सद्य:स्थिती कळविण्याची विनंती करण्यांत आलेली आहे<br>मऔविमचे प्रतिनिधी यांनी पुन्हा माहिती दिली होती की सदर उद्योग घटकास पत्राद्वारे त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यांत आले आहे व तथापि पूर्तता करण्यांत आली नाही.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी उद्योग घटकाकडून कागदपत्राच्या पूर्ततेबाबत ७ दिवस वाट पाहावी व निर्णय घ्यावा, अशी सूचना केली. | मऔविम, अमरावती |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | १२. सुपर एक्सप्रेस बायपास एमआयडीसी टी पॉईंटवर आरटीओचे अधिका-याद्वारे वाहन तपासणी करण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरा येथे करण्या बाबत. | अमरावती एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजक. | एमआयडीसी क्षेतातील उद्योजकांनी दिनांक १८/७/२००९ चे पत्रानवये निवेदन सादर केले की सुपर एक्सप्रेस रोडवरील टी-पॉईंटवर आरटीओ अधिका-याद्वारा वाहने तपासणीसाठी थांबविली जातात. त्यामुळे एमआयडीसीमध्ये ये जा करणा-या वाहनाना अडथळा निर्माण होतो. तसेच त्यामुळे एमआयडीसीमधील कच्चामाल व पक्क्या मालाची ने आण करणा-या वाहन चालकांना त्यांच्याजवळ आवश्यक ती कागदपत्रे असूनसुध्दा आरटीओ अधिका-यांच्या तपासणीचा त्रास होतो, त्यामुळे ते एमआयडीसीमध्ये येण्याचे टाळतात. करीता सदर टी पॉईंटवर वाहने थांबविण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरामध्ये चेकपोस्ट आहे, तेथे वाहने थांबवावीत, असे सूचविले आहे.<br>कार्यालयीन पत्र दिनांक २७/७/२००९ व मागील सभेतील चर्चेनुसार २/९/२००९ चे पत्रान्वये प्रादेशिक मार्ग परिवहन अधिकारी, अमरावती यांना योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत आलेली आहे.<br>औद्योगिक संघटनेने माहिती दिली की वाहन तपासणी मध्यंतरी बंद करण्यांत आली होती, ती आता पुन्हा सुरु करण्यांत आली आहे.<br>सभेला परिवहन कार्यालयाचे अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सद्य:स्थितीबाबत माहिती मिळू शकली नाही.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी परिवहन कार्यालयाकडून लेखी उत्तर प्राप्त करावे, अशी सूचना केली. | प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती |
| | १३. अमरावती एमआयडीसी क्षेत्राला न्यू इंडस्ट्रीयल टाऊनशीप म्युनिसिपल काऊंसीलचा दर्जा मिळण्या बाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी माहिती दिली की औद्योगिक संघटनेने निवेदन सादर केले होते की अमरावती एमआयडीसी ही महानगरपालिका हद्दीमध्ये असणारी एकमेव एमआयडीसी आहे. मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे येथे मनपाचा मालमत्ता कर, ऑक्ट्राय, एमआयडीसी चे सर्व्हीस चार्जेस व वॉटर चार्जेस लागू आहेत. अमरावती महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर उद्योजकांना कच्चा मालावरील जकात कर अर्धा टक्के, कारखान्याच्या बांधकामावर १० पैसे व १५ पैसे प्रति चौ. फुट या सवलतीच्या दराने मालमत्ता कराची आकारणी केली जात होती. आता रु. १.५० प्रति चौ. फुट दर आकारला जात आहे. त्यामुळे येथील उद्योजक शेजारील जिल्हयामधील उत्पादनांच्या किंमती सोबत | मऔविम, अमरावती |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | | देखील स्पर्धा करु शकत नाही. करीता अमरावती एमआयडीसी क्षेत्राला इंडस्ट्रीयल टाऊनशीप म्युनिसिपल काऊंसीलचा दर्जा मिळावा, अशी मागणी केली होती. चर्चेनंतर सदर विषयाबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यांत यावा, असे मागील सभेत ठरले होते.<br>कार्यालीन पत्र दिनांक २२/७/२००९ अन्वये निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई यांना शासन स्तरावर पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने सदर विषय राज्य स्तरीय समितीमध्ये चर्चेसाठी घेण्यांत यावा, अशी विनंती करण्यांत आली आहे.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी इतर ठिकाणी याबाबत काय कार्यवाही करण्यांत आली? याबाबत माहिती घ्यावी व नंतर या विषयावर चर्चा करावी, अशी सूचना केली. | |
| | १४. नवीन उद्योग उद्योगांना सुरुवातीची ५ वर्षे जकात कर व मालमत्ता कर यांत सुट मिळण्याबाबतचा मनपाने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी बाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | नवीन उद्योग उद्योगांना सुरुवातीची ५ वर्षे जकात कर व मालमत्ता कर यांत सुट मिळण्याबाबतचा मनपाने ठराव केला असल्याची माहिती औद्योगिक संघटनेने दिली.<br>मनपाचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की मनपाद्वारा १/७/२००९ पासून फक्त जकातकरात सुट देण्याची तरतूद ठेवलेली आहे. परंतु मालमत्ता करात सुट देण्यात आलेली नाही.<br>मा. अध्यक्ष महोदयांनी याबाबत मा. आयुक्त, महानगरपालिका यांची भेट घेऊन याबाबत चर्चा करावी व याबाबतचा प्रस्ताव करण्याबाबत त्यांचेस्तरावर पाठपुरावा करण्याची सुचना औद्योगिक संघटनेला केली. तसेच सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन बंद करण्याची सूचना केली (विषय बंद).. | महानगर पालिका , अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | १५. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा बंदोबस्त करण्याबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी माहिती दिली की औद्योगिक संघटनेने अशी माहिती दिली की एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा त्रास उद्‌भवत आहे, करीता लवकरच बंदोबस्त करण्यांत यावा. तसेच सदरील परिसरात सगळीकडे घाण पसरली असल्यामुळे मच्छरांचा त्रास वाढला आहे, करीता महानगरपालिकाद्वारा फॉग मशिनद्वारे फवारणी करण्यांत यावी, अशी मागणी केली आहे. मागील सभेत ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेला कार्यालयीन पत्र दिनांक २/९/२००९ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी महानगरपालिकेची स्वच्छता राखण्यासंदर्भात महत्वाची भूमिका आहे. करीता सदर विषयावरील चर्चेकरीता उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका यांना पुढील सभेला बोलावण्यांत यावे, अशी सुचना केली. | महानगर पालिका , अमरावती. |
| ३ | मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय. | | | |
| | १. मे. राधिका पॅकेजींग प्रा. लि., सी-२२, एमआयडीसी अेरिया, नांदगांव पेठ या उद्योग घटकामध्ये काम करणा-या तंत्रज्ञ / कामगार याच्यावर वारंवार हमला करुन मारझोड केल्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | सदर उद्योग घटकाने दि. १८/९/२००९ चे पत्रान्वये पोलिस आयुक्त, अमरावती यांचेकडे तक्रार केलेली आहे की त्यांच्या कारखान्यांत काम करणा-या तंत्रज्ञ व कामगार यांच्यावर कांही असामाजिक तत्व हमला करुन मारझोड करीत आहेत. सदर तंत्रज्ञ व कामगार हे एमआयडीसी क्षेत्रातच राहात असल्यामुळे सदर परिसर हा एकाकी परिसर आहे. मारझोड केल्यानंतर रितसर नांदगांव पेठ पोलिस स्टेशनमध्ये तक्रारीची नोंद करण्यांत आलेली आहे. तथापि याबाबत पोलिस विभागाकडून संबंधितावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे संबंधित उद्योग घटकाचे संचालक यांनी भिती दर्शविली आहे की पोलिस विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नसल्यामुळे त्यांचेकडे काम करीत असलेले तंत्रज्ञ / कामगार काम सोडून पळून जातील. त्यामुळे त्यांना त्यांचा उद्योग बंद करावा लागेल.<br>करीता कार्यालयीन पत्र दि. २२/९/२००९ अन्वये जिल्हा पोलिस अधिक्षक (ग्रामीण), अमरावती यांना त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती कळविण्याची विनंती करण्यांत आलेली आहे. तसेच त्यांना सभेला उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत आलेली आहे. | शहर पोलिस विभाग<br><br>जिल्हा परिषद<br><br>मऔविम |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | | पोलीस विभागाचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की सदर विषय शहर पोलीस विभागांतर्गत येतो.<br>औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी यांनी या विषयावर निवेदन केले की सदर विषयामध्ये कांहीसा स्थानिय राजकारणाचा संबध आहे, करीता संबंधितावर कार्यवाही होत नाही.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी नेमका कोणाकडून उपद्रव होत आहे, ह्याची माहिती घ्यावी व पोलिस विभाग, जिल्हा परिषद, मऔविम या विभागांचे प्रतिनिधींची सभा आयोजित करुन त्यामध्ये सदर विषयावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचना केली. | |

आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभा समाप्त करण्यांत आली.

स्वा/-
जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र.

स्वा/-
महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव, जि.उ.मि.,अमरावती.